# उत्तरपत्रिकेचे पुनर्मुल्यांकन करण्याबाबतचा अर्ज

## डी.टी.एड्. व डी.एल.एड्.परीक्षा जून २०१८

| कार्यालयीन उपयोगासाठी | |
|---|---|
| अर्ज नोंदणी क्र. | |
| प्रकरण क्र. | |

प्रति,

आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - १

महोदय,

मी खाली सही करणार विनंती करते /करतो की, मी जून २०१८ च्या अध्यापक शिक्षण पदविका/प्राथमिक शिक्षण पदविका परीक्षेसाठी नमूद केलेल्या बैठक क्रमांकाने प्रविष्ठ झाले /झालो होते /होतो. सदर परीक्षेच्या माझ्या खालील विषयांच्या उत्तरपत्रिका/उत्तरपत्रिकांचे पुनर्मुल्यांकन करण्यासाठी मी प्रति विषय रु. ५००/- (रुपये पाचशे मात्र) प्रमाणे शुल्क भरत आहे. माझा आवश्यक तपशील खालीलप्रमाणे:

| परीक्षा बैठक क्रमांक | परीक्षार्थीचे पूर्ण नाव | अ. वि. सांकेतांक क्र. | केंद्र क्रमांक |
|---|---|---|---|
| | | | |

| पिनकोडसह पूर्ण पत्ता : | | |
|---|---|---|
| | | |
| | | |
| तालुका : | जिल्हा : | पिनकोड नंबर |
| भ्रमणध्वनी (मोबाईल क्र.) | | |

उत्तरपत्रिकेचे पुनर्मुल्यांकन करण्याबाबतचा तपशील:- विषय शिक्षकांच्या अभिप्रायासह उत्तरपत्रिकेची छायाप्रत जोडली आहे.
( संकेतस्थळावरील गुणांची अथवा गुणपत्रिकेची प्रमाणित छायाप्रत (झेरॉक्स ) सोबत जोडावी.)

| अ.क्र. | विषयाचे नाव व विषय कोड | उत्तराचे माध्यम | मिळालेले गुण |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

| उत्तरपत्रिकेचे पुनर्मुल्यांकन करण्यासाठी अर्जामध्ये नमूद केलेल्या विषयांची एकूण संख्या | भरलेले शुल्क | शुल्काचा तपशिल | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | डी.डी.क्रमांक | पावती क्रमांक | चलन क्रमांक | दिनांक |
| | | | | | |

वर दिलेली माहिती खरी असून या अर्जाच्या मागे दिलेल्या अटी /शर्ती व सूचना मी वाचल्या असून त्या मला मान्य आहेत.

विद्यार्थ्याची स्वाक्षरी

प्राचार्य स्वाक्षरी
अध्यापक विद्यालय शिक्का

दिनांक :
ठिकाण :

# उत्तरपत्रिकांचे पुनर्मुल्यांकन करण्याबाबतच्या अटी व शर्ती

**(शासनपत्र क्रमांक : परीक्षा -२०१५/प्र.क्र.२५७/एसडी-२, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, दिनांक ६ फेब्रुवारी २०१६)**

१) **फक्त उत्तरपत्रिकेच्या छायाप्रतीची मागणी करणारे विद्यार्थीच पुनर्मुल्यांकनासाठी अर्ज करु शकतील.**

२) पुनर्मुल्यांकनासाठी विद्यार्थ्याने विहीत नमुन्यात अर्ज करणे आवश्यक राहील.

३) यासाठी प्रती विषय रु. ५००/- शुल्क परिषदेकडे जमा करावे लागेल.

४) पुनर्मुल्यांकनासाठी जास्तीत जास्त तीन विषयांसाठी अर्ज करता येईल.

५) **विद्यार्थ्यांनी उत्तरपत्रिकेची छायाप्रत मिळाल्यानंतर पाच (०५) दिवसांच्या आत विहित नमून्यात आपल्या अध्यापक विद्यालयातील विषय शिक्षकांकडून उत्तरपत्रिकेची छायाप्रत तपासून घेवून त्यांच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अर्ज करणे आवश्यक राहील. अपूर्ण माहितीचा प्राप्त झालेला अर्ज ग्राहय समजला जाणार नाही तसेच अशा अर्जांचे परिषदेकडे प्राप्त झालेले शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत मिळणार नाही याची नोंद घ्यावी.**

६) परिपूर्ण भरलेला अर्ज विद्यार्थ्यांस किंवा त्यांच्या प्रतिनिधीमार्फत परिषदेकडे समक्ष सादर करावा लागेल.

७) विद्यार्थी केवळ लेखी परीक्षेच्या उत्तरपत्रिकेच्या पुनर्मुल्यांकनासाठी मागणी करु शकतील. तोंडी, प्रात्यक्षिक, अंतर्गत मूल्यमापन व प्रकल्पलेखन किंवा तत्सम उत्तरपत्रिकेचे पुनर्मुल्यांकन करण्याची मागणी करता येणार नाही.

८) उत्तरपत्रिकेचे पुनर्मुल्यांकनाची कार्यवाही खालीलप्रमाणे करण्यात येईल.

i) वस्तुनिष्ठ प्रश्न (१ किंवा अर्ध्या गुणांचे प्रश्न. उदा. रिकाम्या जागा, जोड्या लावा, योग्य पर्याय निवडा, चूक की बरोबर लिहा. इ. प्रकारचे प्रश्न) वस्तुनिष्ठ प्रश्न पुर्णपणे तपासले जावून त्यामध्ये होणारी गुणांची वाढ किंवा घट जशीच्या तशी ग्राह्य धरण्यात येईल.

ii) अध्यापक विद्यालयातील संबंधित विषयाच्या शिक्षकांनी ज्या प्रश्नामध्ये गुणांची वाढ होत आहे असे कळविले आहे तेवढ्याच प्रश्नाचे पुनर्मुल्यांकन करणेत येईल.

iii) इतर सर्व प्रश्न गुणात बदल होणाऱ्या उत्तराबाबतच्या निर्णय समितीमध्ये बहुमताने मान्य होणे आवश्यक आहे. समान संख्येच्या मतांच्या बाबतीत नियामक/ समिती प्रमुख यांचा निर्णय अंतिम राहिल. त्यामधील वाढ/घट ग्राह्य धरण्यात येवून असे बदल विहित पध्दतीने अध्यक्षांच्या मान्यतेने सदर निर्णय अंमलात आणले जातील.

iv) याप्रमाणे उत्तरपत्रिकेचे पुनर्मुल्यांकन झाल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यास प्राप्त झालेले सुधारीत गुण हे त्याने त्या विषयात अशा प्रश्नांसाठी पूर्वी मिळालेल्या गुणाच्या (मूळ गुणांच्या) किमान ५% कमी किंवा जास्त असतील तरच सुधारित गुण ग्राह्य धरण्यात येतील. अन्यथा निकालात कोणताही बदल न करता विद्यार्थ्यास 'नो चेंज' कळविण्यात येईल.

९) पुनर्मुल्यांकनामध्ये विद्यार्थ्याच्या गुणात बदल झाल्यास तसे संबधित विद्यार्थ्यास व अध्यापक विद्यालयास कळविण्यात येईल, त्यानुसार संबंधित विद्यार्थ्याने आपले मूळ गुणपत्रक परिषदेकडे जमा करावे. त्यानंतरच त्यास सुधारित गुणपत्रक विनामूल्य देण्यात येईल.

१०) उत्तरपत्रिकेचे पुनर्मुल्यांकन केल्यानंतर त्यावर होणारा निर्णय अंतिम राहील व तो विद्यार्थ्यावर बंधनकारक राहील. त्यानुसार पुनर्मुल्यांकनानंतर संबंधित विद्यार्थ्याची मूळ संपादणूक आपोआप रद्द होवून सुधारित संपादणूक विद्यार्थ्यास स्वीकारावी लागेल. प्राप्त झालेले गुण हे त्याने पूर्वी मिळविलेल्या गुणांच्या (मूळ गुणांच्या) ५% पेक्षा कमी होत असतील तरच ते कमी करण्यात येतील.

११) अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या बाबतीत पुनर्मुल्याकनानंतर त्याच्या मूळ निकालात बदल होत नसल्यास तसेच विषयात उत्तीर्ण होत नसल्यास ५% पर्यंतचा गुणबदल प्रकरणी त्याचा मूळ निकाल कायम ठेवण्यात येवून त्यास 'नो चेंज'कळविण्यात येईल.

१२) एकदा उत्तरपत्रिकेचे पुनर्मुल्यांकन केल्यानंतर त्याच उत्तरपत्रिकेच्या पुन:श्च गुणपडताळणी, पुनर्मुल्यांकन किंवा छायांकित प्रतीची मागणी करता येणार नाही.

१३) पुनर्मुल्यांकन संदर्भातील तक्रार निवारण पध्दती ही निकालात सुधार होण्यासाठी विद्यार्थ्यास उपलब्ध करुन देण्यात आलेली अतिरिक्त सुविधा असल्यामुळे यानुसार कार्यवाही करीत असताना निकाल जाहीर होण्यास विलंब झाल्यास होणाऱ्या संभाव्य परिणामास / शैक्षणिक नुकसानीस परिषद जबाबदार असणार नाही.

१४) पुनर्मुल्यांकन केलेल्या उत्तरपत्रिकेची छायाप्रत विद्यार्थ्यास दिली जाणार नाही किंवा माहिती अधिकारातही उत्तरपत्रिकेच्या छायाप्रतीची मागणी विद्यार्थ्यास करता येणार नाही. फक्त गुणातील बदल कळविण्यात येईल.

१५) दारिद्र्य रेषेखालील विद्यार्थ्यालाही उत्तरपत्रिकेच्या छायाप्रतिसाठीही व पुनर्मुल्यांकनासाठीही विहित शुल्क भरावे लागेल.

१६) ज्या विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन करावयाचे आहे असे विद्यार्थी परिषदेच्या **बँक ऑफ इंडीया, पुणे शाखा 050010210000031** **(IFSC- BKID 0000500)** या खाते क्रमांकावर ऑनलाईन चलन / RTGS/ NEFT/ डी.डी. तसेच परिषदेत रोखीने रक्कम जमा करु शकतात.

(तुकाराम सुपे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - ०१